# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१,  Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३  दिनांक.०४.०६.२०२०

वाचा:- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश दि. १५.०४.२०२०, दिनांक १९.४.२०२० सुधारीत आदेश दिनांक २०.४.२०२०, दि.२१.०४.२०२०, दि.२३.०४.२०२० आदेश दिनांक ३.५.२०२०, दिनांक १७.०५.२०२०, दिनांक १९.०५.२०२०, दि.२१.०५.२०२०, विस्तारित आदेश दिनांक २२.०५.२०२० व दिनांक ३१.०५.२०२०.

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रं. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि.०२.०५. २०२०, ०३.०५.२०२०, ०५.०५.२०२०, १५.५.२०२०, १७.०५.२०२०, १९.०५.२०२० ,दि.३१.०५.२०२० व दिनांक ०४.०६.२०२०.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना च्या अनूषंगाने नांदेड जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नूसार प्रतिबंधात्मक आदेशा बाबत.

## आदेश

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०१ वरील आदेश दिनांक ३१/०५/२०२० अन्वये जिल्हयात जमावबंदी आदेश, नियमावलीसह पुढील आदेशा पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात संदर्भ क्र.०१ वर नमूद या कार्यालयाचे इतर आदेशातील अटी व शर्ती जशास तसे पुढील आदेशा पर्यंत लागू राहतील असे आदेशीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ०३ वरील आदेश दिनांक ०४.०६.२०२० अन्वये त्यांचे आदेश दिनांक ३१.०५.२०२० मधील परि.७ मध्ये उपपरिच्छेद ( f ) समाविष्ठ करुन यामध्ये कार्यालय/शैक्षणिक संस्था (विद्यापीठे/ महाविद्यालये/शाळा )या ठिकाणचे कर्मचारी यांना फक्त अध्यापना व्यतिरिक्त इतर कामाकरिता कार्यालयात उपस्थित राहून उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन आणि परिक्षांचे निकाल यासारखे व इतर कार्यालयीन कामे करण्यासाठी मुभा दिली आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर,(भा.प्र.से). जिल्हादंडाधिकारी नांदेड, संपूर्ण नांदेड जिल्हयात वरिल प्रमाणे कार्यालय/शैक्षणिक संस्था ( विद्यापीठे/महाविद्यालये/शाळा ) या ठिकाणचे कर्मचारी यांना प्रतिबंधीत क्षेत्र ( Containment Zone ) वगळून उर्वरित क्षेत्रासाठी कोव्हिड-१९ रोग्याच्या प्रादूर्भाव रोकण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाच्या अधिन राहून फक्त अध्यापना व्यतिरिक्त इतर कामाकरिता कार्यालयात उपस्थित राहून उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन आणि परिक्षांचे निकाल यासारखे व इतर कार्यालयीन कामे करण्यासाठी मुभा देण्यात येते.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

हे आदेश दि. ०४.०६.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

D PC CORONA

Scanned with CamScanner